म. ग्रं. सं. ठाणें
विषय बालवाङ्मय
वा. क्र. 3920

# पुणें विद्यापीठ


लेखक :- डॉ. रा. वि. ओतुरकर

IRBK-0103120
IRBK-0103120

म. ग्रं. सं. ठाणें
विषय वाङ्मय
ग्रा. नं. ११

# पुणें विद्यापीठ

स्वाध्याय माला
पुष्प १६७ वें



प्रा. रा. चि. ओतुरकर

अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २

स्वाध्यायमाला

मध्यम विभाग

3920

# पुणें विद्यापीठ

— लेखक —

प्रा. रा. त्रि. ओतुरकर, एम्. ए.
पुणें

IRBK-0103120
IRBK-0103120
दा. क्र. 3920
बि. बा. वा.

संच ८ वा

पुष्प १६७ वें

१९५२ ]

[ किं. ६ आणे

आवृत्ति पहिली

# पुणें विद्यापीठ

सर्वाधिकार स्वरक्षित

## संपादकीय

भाषावार प्रांतरचनेच्या मागणीप्रमाणेंच भाषिक-प्रादेशिक विद्यापीठाची मागणी फार जुनी आहे. महाराष्ट्रासाठीं एक स्वतंत्र विद्यापीठ असावें ह्यासाठीं आजपर्यंत अनेकांनीं दीर्घ प्रयत्न केले. आज हें विद्यापीठ स्थापन झालेलें आहे. या विद्यापीठाच्या स्थापनेनें अनेकांना 'कृतकृत्य' झाल्याचें समाधान वाटणार हें साहजिकच असलें तरी विद्यापीठ स्थापन झाल्यानंतरच्या जबाबदाऱ्या फार मोठ्या आहेत. त्या आपणांस पार पाडावयाच्या आहेत. प्रा. रा. वि. ओतुरकर यांनीं या नवीनच जन्मास आलेल्या विद्यापीठाचें स्वरूप, त्याचें प्रयोजन व तत्संबंधीं आकांक्षा काय आहेत याचें थोडक्यांत विवेचन केलें आहे.

हें पुस्तक 'प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन' संपादक कै. महादेव रामचंद्र परांजपे यांच्या स्मृतीस समर्पण केलें आहे.

### १. मालेंतील पुस्तकांचा उपयोग :

(१) सुसंस्कृत नागरिकाला आवश्यक असें ज्ञान या पुस्तकांच्या वाचनानें मिळतें.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयास पूरक अशी माहिती या पुस्तकांत दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालयें व शिक्षण या संस्थांचीं वाचनालयें व प्रौढांचे शिक्षणवर्ग यासाठीं.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगीं देण्यासाठीं, शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगीं पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचें स्वरूप :

(१) सुसंस्कृत नागरिकांस असें वाटत असतें कीं, आपल्या सभोंवतालच्या वस्तु (विमान, रेडिओ, विजेची शक्ति इ.); राजकारणांतील चालू प्रश्न (मजूरपक्ष, घटना समिति इ.); थोर पूर्वजांचीं चरित्रें, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास—यांची माहिती आपणांस असावी. मालेसाठीं विषय निवडतांना वरील दृष्टि ठेविली आहे.

(२) शाळेंत स्थूल मानानें ज्या विषयांचें शिक्षण होतें त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीहि या पुस्तकांतून असते.

(३) मनोरंजक पद्धतीनें उपयुक्त विषयांचें ज्ञान, शाळा कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणें हा मालेचा हेतु आहे.

**किंमत—पुष्प १६१ पासून प्रत्येक पुष्पाची किंमत सहा आणे आहे.**

मुद्रक व प्रकाशक—**वि. गं. केतकर**, लोकसंग्रह छापखाना, ६२४, सदाशिव, पुणें २.




२४ मार्च १९४८ रोजीं सरकारी जाहीर पत्रकांत पुणें विद्यापीठाचा कायदा प्रसिद्ध झाला व इ.स. १९४९ च्या फेब्रुवारी १० तारखेपासून विद्यापीठाच्या कार्यास सुरुवात झाली. या विद्यापीठाच्या स्थापनेसाठीं महाराष्ट्रांत सुमारें तीस–पसतीस वर्षें चळवळ चालू होती. ज्यांनी त्यासाठीं अविश्रांत श्रम केले त्यांपैकीं कांहीं दिवंगत झाले. पण कांहींना तरी देशाच्या स्वातंत्र्याप्रमाणें विद्यापीठाच्या स्थापनेचें स्वप्न सत्यसृष्टींत अवतरल्याचें पाहावयास मिळालें व मोठा आनंद वाटला. खानदेशपासून सोलापुरापर्यंत व ठाण्यापासून रत्नागिरीपर्यंत एक मुंबई सोडून महाराष्ट्रांतील कोंकण व देशावरील नऊ जिल्ह्यांतील उच्च शिक्षणाची जबाबदारी आतां पुणें विद्यापीठाकडे आली आहे. अलीकडे कोल्हापूर संस्थानाचादेखील यांत अंतर्भाव झाला आहे.

हें विद्यापीठ कां स्थापन झालें याची पुष्कळांस कल्पना नसते. कित्येक तर सरळ असा प्रश्न विचारतात कीं, कांहो! एक मुंबई युनिव्हर्सिटी होती ती काय वाईट होती? आणखी तुमचें हें पुणें विद्यापीठ कशाला? या छोट्या पुस्तकांत या प्रश्नाचें उत्तर देऊन शिवाय सामान्य वाचकांसाठीं पुणें विद्या-

पीठाची रचना, त्याच्या उद्योगाचें स्वरूप यासंबंधीं सर्वसाधारण परिचय करून देण्याचें योजिलें आहे.

## विद्यापीठ म्हणजे काय ?

विद्यापीठ म्हणजे भव्य इमारत नव्हे. विद्यापीठ म्हणजे त्याला जोडलेली अनेक महाविद्यालयेंहि (कॉलेजेस) नव्हेत. ज्ञानाचें निर्हेतुक संशोधन करणाऱ्या पंडितांचा समवाय हा विद्यापीठाचा आत्मा होय. हें संशोधन निर्हेतुक हवें. विद्यापीठांतील पंडित हे सरकारी आज्ञेवरून संशोधन करणारे सांगकामे नसावेत किंवा कुठल्या व्यापारी फायद्याच्या आकर्षणानें संशोधनास प्रवृत्त झालेले नसावेत. जेथे शुद्ध ज्ञानाचा निश्चय आहे, जेथें तत्त्वचिंतनाचा छंद आहे, जेथें तत्त्वचर्चेचा धिंग माजलेला आहे तेथें विद्यापीठ स्थापन झालें आहे असें समजावें. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानाची महती सांगतांना म्हटलें आहे :

**म्हणौनि बहुतीं परी पाहातां । पुढुतीं पुढुतीं निर्द्धारितां ।**
**हें ज्ञानिची पवित्रता । ज्ञानींचि आथि ॥**
**जसी अमृताची चावि निवाडिजे । तरी अमृताचि सारिखी म्हणिजे ।**
**तेसें ज्ञान हे उपमिजे । ज्ञानेसीं चि ॥**

ज्ञानेश्वरी, राजवाडेप्रत, अध्याय ४ था १८१–८२

(म्हणून सर्व परींनीं पाहातां व पुनः पुनः विचार करतां असेंच ठरतें कीं, ज्ञानाची पवित्रता ज्ञानांतच आहे ती इतरत्र आढळणें नाहीं. ज्याप्रमाणें अमृताची चव कशी असते हें सांगणें झाल्यास ती अमृतासारखीच असते असेंच म्हणावें लागेल त्याप्रमाणें ज्ञानाला उपमा ज्ञानाचीच.)

या ओव्यांतील 'ज्ञानाकरितां ज्ञान' हें तत्त्व जेथें मनावर बिंबलें आहे तेथें विद्यापीठ स्थापन झालें आहे असें समजावें. प्राचीनकालीं ऋषींच्या आश्रमांतून वेद विद्येचा अभ्यास होई, तेव्हां त्याच्या नफ्यातोट्याकडे किंवा त्यामुळें राजांकडून मिळणाऱ्या मानसन्मानाकडे ऋषींची दृष्टि नसे. ऋषींचें तत्त्वचिंतन व तत्त्वचर्चा चालू असतां राजे महाराजे त्यांचा उपदेश घेण्यास व सल्ला विचारण्यास येत व तो त्यांस रुचो वा न रुचो, निःस्पृहपणें दिला जाई. सातव्या

शतकांत हर्षकालीं विद्यमान असलेल्या **नालंदा** विद्यापीठाचें वर्णन युवान चांग या चिनी बुद्धभिक्षूच्या लेखनांत आढळतें. **शीलभद्र** हा त्या विद्यापीठाचा कुलपति होता. युवान् चांग लिहितो :—

'या सुचरित लोकांचें जीवन स्वाभाविकच व्रती, संयमी व नियमनिष्ठ आहे. या गोष्टीचा एकच पुरावा म्हणजे या मठाच्या सातशें शतकांच्या दीर्घ आयुष्यांत एकहि शिस्तभंग करणारा भिक्षु येथें निघाला नाहीं. प्रातःकालापासून सायंकालापर्यंत येथें अखंड वाग्यज्ञ सुरू असतो. निरनिराळ्या देशांतील असंख्य विद्वान् या विद्यापीठांत येतात व आपल्या शंकांचें समाधान करून घेतल्यानंतर आपल्या पांडित्याच्या अनंत जलधारांनीं भारताची बौद्धिक भूमि समृद्ध करतात.' **ब्रूसट्रुस्कॉट** या लेखकानें 'रेडाव्रिक युनिव्हर्सिटी' या नांवाचा एक वाचनीय ग्रंथ लिहिला आहे. त्यांत आपली विद्यापीठाची कल्पना स्पष्ट करून सांगतांना तो लिहितो, 'समजा कीं, एखाद्या कालीं कांहीं व्यक्तींनीं सत्यसंशोधनाच्या तळमळीनें जगरहाटीच्या रोजच्या उद्योगांतून निवृत्त होण्याचा निश्चय केला, तसेंच आपला सत्यसंशोधनाचा हेतु साध्य होण्यास अवश्य तो संयम व शिस्त पाळण्याचें ठरविलें व त्याबरोबरच आपणांस जें जें ज्ञात होईल तें तें मुक्तहस्तानें भेदाभेद न पाहातां इतरांस देण्याचें ठरविलें अशा प्रकाराच्या संकल्पांनीं प्रेरित झालेल्यांनीं कांहीं निधि जमविला, इमारत बांधली, ग्रंथसंग्रह केला व सामुदायिक रीत्या अभ्यासास सुरुवात केली, हें दृश्य जेथें दिसेल तेथें विद्यापीठ स्थापन झालें आहे असें समजावें. सारांश, जेथें संशोधन—सत्यसंशोधन—चालू असेल, इतकेंच नव्हे तर जेथें सत्यसंशोधनाच्या प्रवृत्तीची जोपासना होण्याजोगें वातावरण असेल तें स्थळ विद्यापीठच होय. अशी ज्ञानाची उपासना चालू असतां । जितुकें आपणासी ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें । शाहणें करूनि सोडावें । बहुत जन ॥ असा विचार मनांत येऊन तत्सिद्ध्यर्थ महाविद्यालयें स्थापन होतील, तेथें छात्रगण जमेल व विद्येचे उपासक आपल्या ज्ञानाचा त्यांना लाभ देत राहतील. परंतु महा-

विद्यालयें किंवा विद्यार्थी हीं विद्यापीठाची मुख्य अंगें म्हणण्याऐवजीं त्या पूरक व अनुषंगिक गोष्टी समजाव्या. आपण वर्गांतील मुलांना आपल्या फाडफाड वक्तृत्वानें चकित करून सोडतो एवढ्यावरच प्राध्यापकानें प्रौढी मिरविण्यासारखें कांहीं नाहीं व असे प्राध्यापक विद्यापीठांत आहेत एवढ्यानें विद्यापीठानें संतुष्ट राहातां कामा नये. मुलांना शिकविणें ही जशी अनुषंगिक किंवा ओघानें येणारी गोष्ट आहे तशीच शिकविलेल्या मुलांच्या परीक्षा घेणें व त्यांना अखेर पदवी देणें या देखील अनुषंगिक गोष्टीच होत. विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यास बी. ए. ची पदवी देणें याचा अर्थ तो ज्ञानोपासनेस पात्र झाला असा समजावयाचा.

कित्येक वेळां विद्यार्थ्यांस व्यवसायोपयोगीं असें शिक्षण विद्यापीठांतून दिलें जातें. हल्लींच्या जीवनकलह-तीव्रतेच्या काळांत तर शिक्षणाची कसोटी तें भावी जीवनास कितपत उपयुक्त ठरतें यावर अजमावली जाते. मुलें तर चक्कच म्हणतातः ‘ सर, तें तुमचें ज्ञान बाजूस राहूं द्या, तें पुढें केव्हांतरी पाहूं. तूर्त परीक्षेंत पास होण्यास काय वाचूं तें सांगा.’ कारण ती परीक्षा पास झाल्यावर नोकरी मिळणार असते. कित्येक तर म्हणतात कीं, विद्यापीठांतून उगाच रोमचा इतिहास व शब्दांच्या व्युत्पत्त्या शिकवीत बसण्यापेक्षां लघुलेखन किंवा टंकलेखन असें कांहीं उपयुक्त शिकविणें अधिक चांगलें. कारण त्यायोगें मुलांचा व्यावहारिक फायदा अधिक होण्याचा संभव आहे. या विचारसरणीनें भारावलेले कित्येक प्राध्यापक मुलांना परीक्षा पास होण्यास यंत्राप्रमाणें तयार करण्यासाठीं प्रश्नोत्तरें किंवा मार्गदर्शिका लिहून प्रसिद्ध करतात. व्यवसायोपयोगी शिक्षण व तत्संबंधीच्या परीक्षा या विद्यापीठांत क्वचित् अंतर्भूत झाल्या तरी विद्यापीठाचें तें प्रमुख अंग नव्हे. हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठीं हार्वर्ड विद्यापीठाचे डॉ. लॉवेल यांनीं तर असें म्हटलें आहे कीं, विद्यापीठ तें, कीं जेथें उपयुक्त असें कांहीं शिकविलें जात नाहीं ! डॉ. लॉवेल यांनीं आपलें म्हणणें कांहींसें अति-

शयोक्त शब्दांत मांडलें असलें तरी त्यांत तथ्यांश आहे. इतकेंच नव्हे तर विद्यापीठाचें स्वरूप कोणतें असावें यासंबंधीं ध्येयात्मक दिग्दर्शन करणारें असेंच आहे.

विश्वविद्यालयांत किंवा विद्यापीठांत ज्ञानाच्या सर्वच शाखांची उपासना चालली पाहिजे असें नाहीं. किंबहुना तें शक्यहि नाहीं. कारण ज्ञान अनंत आहे व मनुष्यशक्ति सांत आहे. तसेंच विश्वविद्यालयांतील शिक्षण हें सार्वत्रिक स्वरूपाचें असलें पाहिजे, त्यांत प्रादेशिकपणा असतां कामा नये, हेंहि म्हणणें खरें नाहीं. इंग्लंडांत इंग्रजी विद्येचा, फ्रान्समध्यें फ्रेंच समाजाच्या जीवनाचा, महाराष्ट्रांत मराठी भाषेचा व मराठी साधुसंताच्या किंवा शेतकरी जीवनाच्या परंपरेचा अभ्यास विशेषत्वानें होणें साहजिक आहे. विश्वविद्यालय शब्दानें व्यापकपणा सूचित होतो हें खरें आहे, पण प्रादेशिक विशेषाच्या अभ्यासानें त्या व्यापकपणास बाध येतो असें समजण्याचें कारण नाहीं. विद्यापीठाचें मुख्य लक्षण म्हणजे मिळालेलें ज्ञान भेदाभेद न ठेवतां किंवा पक्षपात न करतां तें सर्वांस सर्वांना देणें, ज्ञानमंदिराचे दरवाजे सर्वांना खुलें ठेवणें हें होय. येथें कोणीहि या, जवळचे या, दूरचे या, गरीब या, श्रीमंत या, ब्राह्मण या वा मांतग या, गोरे या वा काळे या, ज्ञानाची लालसा ही या मंदिर प्रवेशाची अट व मिळविलेलें ज्ञान असेंच सर्वांस मुक्तहस्तानें देण्याचें अभिवचन एवढेंच ज्ञानार्जनाचें शुल्क, हा आदर्श आपल्या देशांत प्राचीन विद्यापीठांपुढें असे. आज काळ बदललेला असला व शुल्क घेतल्यांवाचून चालत नसलें तरी विद्यापीठांत भेदभाव असतां कामा नये हें तत्त्व आजहि सर्वमान्य आहे. ज्ञानाचा प्रादेशिकपणा व वृत्तीचा संकुचितपणा या दोन गोष्टी भिन्न आहेत. ज्ञानाचा प्रादेशिकपणा किंवा मर्यादितपणा हा केवळ इष्टच नव्हे तर सत्यसंशोधनास उपकारक ठरतो. वृत्तीचा संकुचितपणा कोठेंहि झाला तरी तो विघातकच होय.

कित्येक म्हणतात कीं, प्रादेशिक ज्ञानाच्या जोपासनेनें कुटीर वृत्ति बळावण्याची भीति आहे. या आक्षेपांत थोडेसें तथ्यहि आहे. पण यासाठीं प्रादे-

शिक संस्कृतीची व ज्ञानाची हेळसांड करावी व जेवढें कांहीं अखिल भारतीय असेल तेवढेंच घ्यावें हें म्हणणें खरें नाहीं. मराठींतील तुकाराम–रामदासाचा अभ्यास महाराष्ट्रांत जितक्या समरसतेनें होईल तितका तो गुजराथेंत होणार नाहीं. याच्या उलट गुजराथचा नरसिंह मेहेता मऱ्हाठियांस तितक्या प्रमाणांत हलवूं शकणार नाहीं, यासाठीं दोघांनीं दोहोंचीहि आबाळ करण्यापेक्षां महाराष्ट्रांत तुकाराम–रामदासाचा अभ्यास करून साधर्म्य ज्ञानासाठीं शेजारच्या प्रांतांतील संतांची, भाषेची व चालीरीतीची तुलनात्मक माहिती करून घेणें व विचारांत सापेक्षता निर्माण करणें हें इष्ट आहे. यायोगें दुरभिमान टळेल व आपापल्या साधुसंतांचें सम्यक् सापेक्ष ज्ञान होईल.

## आणखी विद्यापीठें कशाला ?

'एक मुंबई युनिव्हर्सिटी असतां आणखी पुणें युनिव्हर्सिटी कशाला?' या प्रश्नाचें उत्तर वरील चर्चेंत सहज येऊन गेलें आहे. आतां महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक येथें प्रादेशिक विद्यापीठें स्थापन करण्याचें धोरण ठरलें म्हणून निराळें. परंतु इ. स. १९४७ पर्यंत उत्तरेस शिकारपूरपासून दक्षिणेस सावंतवाडीपर्यंत ८०० मैल लांब व २५० मैल रुंदीच्या प्रदेशांत एकटें मुंबई विद्यापीठ सर्व उच्चशिक्षणाचा कारभार पहात होतें. हा सर्व कारभार अवजड होता यांत शंका नाहीं. प्रादेशिक विद्यापीठांच्या स्थापनेनें इतर कांहीं न झालें तरी या अवजड कारभाराचें श्रमविभागाच्या तत्त्वावर सोइस्कर विकेंद्रीकरण झालें यांत शंका नाहीं. पण मुंबई विद्यापीठाचा अवजड कारभार हलका किंवा आटोपशीर करण्यास मदत करावी हा कांहीं प्रादेशिक विद्यापीठ स्थापन करण्याचा खरा हेतु नाहीं. प्रादेशिक विद्येची आबाळ टळावी, प्रादेशिक विद्वानांची व अभ्यासकांची बूज राखली जावी, प्रादेशिक वैशिष्ट्याची जोपासना होऊन भारतीय जीवन विविधतेनें नटलेलें बहुसाल व्हावें व या विविध रंगांत इंद्रधनुष्याचें सौंदर्य व ऐनजिनसीपणा

खुलून दिसावा हा प्रादेशिक विद्यापीठाच्या स्थापनेचा आमच्या मतें खरा उद्देश होय.

महाराष्ट्रांतील विचारवंतांकडून स्वतंत्र विद्यापीठाची मागणी गेल्या ३०-३५ वर्षांपासून केली जात आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभीं देशभर वंगभंग, स्वदेशी चळवळ वगैरेंनी राष्ट्रीय जागृति झाल्यानंतर राष्ट्रनिर्मितीच्या विविध विधायक अंगांकडे विचारवंतांचें लक्ष गेलें. देशांतील अनेक चळवळींमुळें लोकांत देशाभिमान उत्पन्न झाला. पण तो स्थूल स्वरूपाचा व कांहींसा अभावात्मक होता. नुसता इंग्रज राज्यकर्त्यांविरुद्ध असंतोष म्हणजे देशाभिमान नव्हे. भावी स्वराज्यास अनुरूप अशा नव्या समाजनिर्मितीसाठीं कांहीं रचनात्मक कार्यक्रम जनतेपुढें ठेवणें जरूर होतें. देशांत स्थापन व्हावयाचें राज्य हें पूर्वीच्या मोगलाई किंवा मराठेशाहीप्रमाणें नसून, तें आधुनिक पद्धतीचें लोकराज्य स्थापन व्हावयाचें आहे याबद्दल सर्वांचा निश्चय झालेला होता. लोकराज्य हें कोणी देऊन मिळत नाहीं, कायदा पास होऊन प्राप्त होत नाहीं, तें मिळवावें लागतें व त्यासाठीं लोकशिक्षण, लोकजागृति व स्वावलंबनात्मक आर्थिक कार्यक्रम हीं, समाजविकासाचीं विविध अंगें हातीं घेणें जरूर आहे असें वाटून लोकशिक्षणाच्या पुरस्कर्त्यांनीं इतर अनेक गोष्टींबरोबरच स्वभाषेंतून शिक्षण, भाषिक विद्यापीठ व भाषावार प्रांतरचना या त्रिविध योजनेची आवश्यकता पुरस्कारिली. समाजाच्या उन्नतीसाठीं विविध अंगांनीं झटणारें सरकार व लोक यांच्यांत विचारांचें दळणवळण झाल्याखेरीज लोकांच्या गरजेचें लोण सरकारपर्यंत जाऊन पोहोंचणार नाहीं व सरकारी योजना पुऱ्या यशस्वी होणार नाहींत. यासाठीं सरकार व लोक यांची विचाराच्या देवघेवीची भाषा एक असावी, म्हणून भाषावार प्रांतरचना हवी. सारांश, भाषावार प्रांतरचना ही लोकशाहीच्या पूर्ततेची समस्या होय. स्वभाषेंतून शिक्षणाचें महत्त्वहि उघड आहे. विचाराचा बारकावा स्वभाषेंतून व्यक्त केल्यानें मनास

पटतो व त्याची संवेदना अभ्यासकाच्या मनास स्वतःचीं विचारवलयें निर्मिण्यास समर्थ करते. याच्या उलट परकीय भाषेंतून विचार मांडल्यानें व सांगितल्यानें तो विचार टिपकागदाप्रमाणें शोषून घ्यावा व फोनोग्राफच्या बांगडीप्रमाणें सही सही परत बोलून दाखवावा असा प्रकार होतो. अध्यात्मिक विचार स्वभाषेंतून व्यक्त करण्याचा पायंडा ज्ञानेश्वरांनीं घातल्याकारणानें तद्विषयक विचार समाजाच्या खालच्या थरापर्यंत कसे जाऊन पोहोंचले आहेत व त्यांतील जिवंत झऱ्यांनीं कितीतरी मानवी मनांची तळमळ शांत केली आहे! इंग्रजी अंमलाच्या मध्यस्तीनें हिंदुस्थान भौतिक युगांत प्रवेश करीत असतां भौतिक शास्त्रांचा स्वभाषेंत विस्तार करून 'पारि अमृतातेंहि पैजेसी जिंके, असे म्हणणारा बहाद्दर भौतिक क्षेत्रांत निपजावयाचा काळ यावयाचा असेल, तर खालपासून शक्य तितक्या वरपर्यंत स्वभाषेंतून शिक्षण देणें अवश्य आहे. ही गोष्ट भाषाधिष्ठित प्रादेशिक विद्यापीठाच्या स्थापनेखेरीज शक्य होणार नाहीं म्हणून भाषिक विद्यापीठाची आवश्यकता आहे.

## फार वर्षांची मागणी

सुमारें ४०।४५ वर्षांपूर्वी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतुःसूत्रींत व्यापक राष्ट्रीय जीवनाचें स्वरूप ज्यांनीं गुंफिलें त्यांच्या मनांत भावी स्वातंत्र्याच्या लाभासाठीं व स्वागतासाठीं तरुण पिढी शिक्षणानें तयार झाली पाहिजे हा विचार होता हें वर सांगितलें. तेव्हांपासून सतत विद्यापीठाच्या आवश्यकतेचा उच्चार महाराष्ट्रांत होत आहे. इ. स. १९१७ सालीं मुंबई प्रांतिक शिक्षण संमेलन सर नारायण चंदावरकर यांचे अध्यक्षतेखालीं झालें, त्यांत महाराष्ट्र विद्यापीठाबद्दल ठराव पास झाला. इ. स. १९२४ सालीं मुंबई युनिव्हर्सिटी रिफॉर्म्स कामिटी सर चिमणलाल सेटलवाड यांचे अध्यक्षतेखालीं स्थापन झाली. तिनें प्रादेशिक विद्यापीठांचें तत्त्व मान्य करून महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक व सिंध या प्रांतांसाठीं प्रत्येकीं

स्वतंत्र विद्यापीठ असावें असें प्रतिपादिलें. इ. स. १९२६ सालीं मराठी साहित्य संमेलनानें महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्थापनेसाठीं साह्य करावें अशी सरकार व मराठी संस्थानिक यांना विनंति केली. इ. स. १९२८ सालीं महामहोपाध्याय प्रा. पोतदारांचे प्रेरणेनें महाराष्ट्र युनिव्हर्सिटी असोसिएशन स्थापन होऊन तिनें निधि जमविण्याचें व लोकजागृति करण्याचें काम अंगावर घेतलें व त्यासाठीं त्यांनीं पुढील ४।५ वर्षांत महाराष्ट्रभर दौरा काढला. इ. स. १९३३ सालीं डेक्कन कॉलेजच्या भवितव्याचा प्रश्न निघाला असतां बॅ. जयकर यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालेल्या महाराष्ट्र युनिव्हर्सिटी कमिटीनें महाराष्ट्रासाठीं विद्यापीठाची रूपरेखा आखली. इ. स. १९३७ सालीं फर्ग्युसन कॉलेजचे लोकप्रिय प्रिन्सिपॉल डॉ. ग. स. महाजनी यांनीं मुंबई कायदे मंडळांत महाराष्ट्र युनिव्हर्सिटी संबंधीं ठराव आणला. इ. स. १९४१ सालीं पुनः साहित्य परिषद, युनिव्हर्सिटी असोसिएशन व युनिव्हर्सिटी कमिटी या त्रिवर्गातर्फे सरकारकडे एक शिष्टमंडळ गेलें. अखेर या विद्यापीठाची योजना आखण्यासाठीं ७ फेब्रुवारी १९४२ रोजीं बॅ. जयकर यांचे अध्यक्षतेखालीं ७ जणांची कमिटी नेमण्यांत आली. त्यांत सर रघुनाथराव परांजपे, प्रिं. ध. रा. गाडगीळ, श्री. बाबुराव जगताप, मि. आर. पी. मसाणी, रेव्ह. मॅकेन्झी प्रभृति सभासद होते. तिनें आपला अहवाल इ. स. १९४३ च्या ऑगस्टांत तयार करून पुणें विद्यापीठाच्या योजनेस पाठिंबा दिला. त्या योजनेच्या धर्तीवर कायदेमंडळापुढें १९४७ च्या ऑक्टोबरमध्यें बिल मांडण्यांत आलें व बरीच चर्चा होऊन अखेर २४ मार्च १९४८ ला त्या बिलास कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें. अशा रीतीनें स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वीच विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली होती. आज स्वातंत्र्य आल्यावरहि त्याचें महत्त्व कमी झालें आहे असें नाहीं. किंबहुना लोकशाहीचा पाया रुंदावण्यास व समाजाची एक मूस तयार करण्यास वर सांगितलेल्या तीनहि गोष्टींची आज अत्यंत आवश्यकता आहे. समर्थ विद्यालयाचे संस्थापक कै. विष्णु

गेविंद विजापूरकर, आद्य लोकशिक्षणकार कै. ज. वि. ओक, कै. तात्यासाहेब केळकर, कै. माधवराव परांजपे यांनीं व विद्यमान व्यक्तींत डॉ. जयकर, महामहोपाध्याय पोतदार, प्रिं. धनंजयराव गाडगीळ, प्रिं. महाजनी यांनीं विद्यापीठ स्थापनेचा जो आग्रह धरला त्यास वरील प्रकारचें व्यापक अधिष्ठान आहे. आधीं स्वातंत्र्य कीं, आधीं राष्ट्रीय शिक्षण याचें उत्तर काळानें आलटपालट करून आपल्या परीनें देऊन टाकलें असलें तरी मिळालेल्या स्वातंत्र्याचीं बीजें खोल रुजवण्यास व समाजांत सामुदायिक विचार स्थिर होण्यास मायभाषेंतून शिक्षण, भाषावार प्रांतरचना व भाषिक विद्यापीठाची स्थापना या तीन सुधारणा केल्यावाचून गत्यंतर नाहीं असें आमचें मत आहे.

## पुणें विद्यापीठाची घटना

विद्यापीठाच्या प्रमुखास कुलगुरु असें म्हणतात. सध्यां मुंबई इलाख्याचा गव्हर्नर हाच पहिलीं पांच वर्षें विद्यापीठाचा कुलगुरु असावा असा कायदा आहे. गव्हर्नर हा प्रांताचा मुख्य असल्यानें विद्यापीठासंबंधींचें त्याचें स्थान उच्च पण औपचारिकपणाचें आहे. विद्यापीठाचा उपकुलगुरु हा तेथील खरा कर्ता अधिकारी असून त्याच्या व्यक्तिमत्वाची छाप विद्यापीठाच्या कार्यावर पडते. या जागेवर डॉ. जयकर यांची नेमणूक सरकारनें केली आहे. पुढें उपकुलगुरूची निवड करण्यासाठीं, कार्यकारी मंडळानें बहुमतानें तीन नांवें सुचवावीं व त्यांतील कोणतेंहि एक नांव कोर्टानें प्रमाणशीर मतदान पद्धतीनें निवडावें. उपकुलगुरूची मुदत तीन वर्षें असावी. उपकुलगुरूस आजारीपण वगैरेसारख्या कारणासाठीं रजा घ्यावी लागल्यास त्यांच्या जागीं कुलगुरूंनीं नेमलेल्या एखाद्या शाखाप्रमुखानें ( Dean ) हें काम पाहावें. उपकुलगुरूची जागा सन्मान्य व निर्वेतन अशी आहे. पण कोर्टास तसें वाटल्यास स्टॅटयूट (ठरावा) अन्वयें उपकुलगुरूचा पगार ठरवून देऊन तशा प्रकारची पगारी जागा निर्माण करतां येईल. विद्यापीठाचें चर्चामंडळ ( कोर्ट ), कार्यकारी

मराठी ग्रंथ संग्रहालय नों. नं. १०८७५

मंडळ (एक्झिक्युटिव्ह कौन्सिल) व विद्यामंडळ (ॲकॅडेमिक कौन्सिल) यांच्या वेळोवेळीं सभा बोलावणें, त्यांचे ठराव अंमलांत आले आहेत कीं नाहीं तें पाहणें, आकस्मिक प्रसंगीं जरूर वाटल्यास स्वतःच्याच अधिकारांत एखादी गोष्ट करून ती त्या त्या अधिकारी समितीस नंतर कळविणें, विद्यापीठांत व त्यांच्या निरनिराळ्या शाखा-समित्यांतून शिस्त राखणें, सारांश, विद्यापीठाच्या आवारांत हरएक प्रकारची अपेक्षित पण अलिखित सत्ता चालविण्याचा अधिकार उपकुलगुरूंचा असल्याकारणानें विद्यापीठांत उपकुलगुरूंचें स्थान मानाचें व अधिकाराचें आहे व तें विद्यापीठाच्या सुरळीत कारभारास आवश्यक आहे.

उपकुलगुरूच्या खालोखाल विद्यापीठाचा महत्त्वाचा अधिकारी रजिस्ट्रार (दफ्तरदार) हा होय. हा पगारी अधिकारी कार्यकारी मंडळानें नेमावयाचा आहे. दफ्तरदाराचें काम विद्यापीठांतील हरएक समित्यांच्या कार्याचें दफ्तर सांभाळणें, त्यांचें काम सुरळीत चालेल याची काळजी घेणें, विद्यापीठाचे कायदे-कानु, आवेदनें व नियम यांची अंमलबजावणी बरोबर करण्याची दक्षता घेणें, निरनिराळ्या ठरावांची अंमलबजावणी करणें, सारांश, घटनेच्या कक्षेंत राहून पुनः विद्यापीठाचें कोणतेंहि काम अडूं न देणें हीं रजिस्ट्रारचीं कामें इतकी महत्त्वाचीं आहेत कीं, त्याच्या कार्यक्षमतेवर विद्यापीठाचें यश बऱ्याच अंशीं अवलंबून आहे. कर्तृत्ववान दफ्तरदार स्वतःचा बोज राखून घटनेच्या आधारावर, तिचें उल्लंघन करणारास सभ्यपणानें दटावतो व विद्यापीठाच्या चोखपणाबद्दलचा लौकिक व इभ्रत राखूं शकतो. विद्यापीठाचें चढतें वाढतें वैभव सुसंस्कृत कुलगुरु व कामाचा उरक असणारा चोख दफ्तरदार या दोहोंवर बऱ्याच अंशीं अवलंबून आहे.

## अधिकारी मंडळ

पुणें विद्यापीठाचें काम चालविण्यासाठीं पुढील मंडळें आहेतः—

(१) कोर्ट (चर्चामंडळ)

(२) एक्झिक्युटिव्ह कौन्सिल (कार्यकारीमंडळ)
(३) ॲकॅडॉमिक कौन्सिल (विद्यामंडळ)
(४) फॅकल्टीज (शाखा)
(५) बोर्ड ऑफ स्टडीज (अभ्यासमंडळ)
(६) विद्यापीठ शिक्षण समिति (बोर्ड ऑफ युनिव्हर्सिटी टीचिंग इन् पूना) या समितीस लौकिक भाषेंत 'बट' B. U. T. कमिटी असें नांव पडलें आहे.
(७) विद्यापीठाचे उद्देश पार पाडण्यासाठीं नियमान्वयें निर्माण झालेल्या इतर संस्था.

विद्यापीठाच्या कोर्टाची रचना पुढीलप्रमाणें :—

## वर्ग १ ला : अधिकारान्वये सभासद

(अ) कुलगुरु, उपकुलगुरु, माजी उपकुलगुरु, शाखा-प्रमुख (Dean) व दफ्तरदार.
(ब) मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश, प्रांताचे शिक्षणमंत्री, प्रांताचे शिक्षणाधिकारी वगैरे महत्त्वाचे अधिकारी.
(क) विद्यापीठांतील विद्याखात्यांचे प्रमुख, (Heads of the University Departments) संलग्न महाविद्यालयाचे प्राचार्य, व मान्यता मिळालेल्या संस्थांचे प्रमुख.

## वर्ग २ रा: सामान्य सभासद

(अ) निवडलेले

(१) हायस्कूल शिक्षक मतदार संघांतून ३
(२) हायस्कूल मुख्याध्यापक मतदार संघांतून ४
(३) कॉलेजांतील प्राध्यापक ५
(४) सार्वजनिक संस्थातर्फे, उदाहरणार्थः—

(अ) पुणें म्युनिसिपालिटी (आ) पुणें सबर्बन म्युनिसिपालिटी
(इ) सोलापूर म्यु. यातर्फे प्रत्येकीं १ ३
(ई) या खेरीज इतर विद्यापीठ कक्षेतील म्युनिसिपालिट्यांतर्फे १०
(उ) जिल्हा लोकलबोर्डांतर्फे १०
(ऊ) मुंबई प्रतिनिधिसभे (लेजिस्लेटिव्ह असेंब्ली) तर्फे ४
(ए) मुंबई कायदे कौन्सिलतर्फे १
(ऐ) मराठा चेंबर ऑफ कॉमर्स व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे मिळून २
(ओ) विद्यापीठ क्षेत्रांतील कामगारसंघातर्फे २
(अशा ३७ कामगार संघाची यादी विद्यापीठ पत्रकांत दिलेली आहे)
(औ) मतदार पदवीधरांतर्फे २५
(कोणत्याहि विद्यापीठाच्या पदवीधरांस ५ रु. भरून मतदार होतां येतें)
(आ) वरील निवडलेल्या सभासदांखेरीज कुलगुरूनें नेमलेले तज्ज्ञ व नामांकित शिक्षणाधिकारी, व मागासलेल्यांचे प्रातिनिधि, २५
(इ) एक लाख रु. देणारे देणगीदार,
(ई) पंचवीस हजारांहून अधिक व एकलाखापेक्षां कमी देणगी देणारांतून जास्तीत जास्त ३
एकूण (हल्लीं) १३९

याप्रमाणें चर्चा मंडळाची (कोर्टाची) घटना आहे. कोर्टांतील निवडलेल्या सभासदांची मुदत पांच वर्षे आहे. या कोर्टाची सभा वर्षांतून एक वेळ किंवा जरुरीप्रमाणें अधिक वेळां भरेल. कोर्टास खरें म्हटलें तर सर्व प्रकारचे अधिकार आहेत. परंतु कार्यकारी मंडळ व विद्यामंडळ यांच्या शिफारसी-खेरीज कोणतीच बाब चर्चामंडळापुढें चर्चेस किंवा मान्यतेस येऊं शकत नाहीं. इतकेंच काय पण कार्यकारी मंडळाची आवेदनें (Ordinances) चर्चामंडळा-पुढें आल्यास चर्चामंडळ त्यास मान्यता देतें, ती रद्द करतें, फेरविचारार्थ

परत पाठवितें पण त्यास स्वतः होऊन त्यांत कांहींहि बदल करतां येत नाहीं. ही गोष्ट लक्षांत घेतां चर्चा मंडळाचे प्रत्यक्ष अधिकार बरेच मर्यादित झाले आहेत. इतकें मात्र खरें कीं, सार्वजनिक मताचें सर्वसामान्य प्रतिबिंब त्या मंडळांत पडेल व त्या मंडळाचे शिफारसवजा ठराव इमानानें अंमलांत आणणें हें विद्यापीठाच्या इतर समित्यांचें कर्तव्य राहील. चर्चा मंडळ हें तज्ज्ञमंडळ नव्हे, लोकमंडळ आहे व तेथें लोकमत प्रतिबिंबित होणार. कित्येकास वाटतें कीं विद्यापीठांत म्युनीसिपालिट्या व लोकलबोर्डांचे प्रतिनिधि कशाला? तेथें फक्त पदवधिरांचेंच काम. पण बहुजन समाजाच्या जीवनाशीं फारकत करून तथाकथित सुशिक्षितांनीं चालविलेल्या विद्यापीठाशीं बहुजन समाज कधींहि समरस होणार नाहीं हें त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें. सुशिक्षितांच्या जीवनांतील पुस्तकीपणा जावा व एतद्देशीय विचार व वळण यांच्या ओलाव्यानें विद्यापीठांत नव्यानव्या विद्यांचा अभ्यास व्हावा हें आवश्यक आहे. आज विद्यापीठांत पुस्तकी विद्येची एकंदर शिक्षणक्रमांवर जबरदस्ती झालेली आहे, व आजचा पदवीधर बहुजन समाजास परका वाटत आहे. तसेंच या पदवीधरास अंग मोडून काम करण्याचें बाळकडू मिळालेलें नाहीं व जीवनांतील धकाधकी पासून दूर राहिल्यानें निव्वळ पुस्तकी विद्येंतहि तेजस्वीपणापेक्षां उसनवारीच अधिक दृष्टीस पडते. शिक्षणाच्या क्षेत्रांत संशोधन केलेले अभ्यासक असें सांगतात कीं, पुस्तकी विद्येस प्रत्यक्ष जीवनाची जोड मिळाल्यानें पुस्तकी अभ्यासासहि उजळा मिळतो व अभ्यासकास नवे विचार स्फुरतात. सारांश, यापुढें विद्यापीठांतील कार्याचा बहुजनसमाजाशीं संबंध आला पाहिजे. यासाठीं म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें व कामगारसंघाचे प्रतिनिधि यांना विद्यापीठांतील चर्चा मंडळांत स्थान दिलें गेलें पाहिजे.

चर्चा मंडळा ( कोर्ट )ची रचना व अधिकार वर सांगितले आहेत. आतां कार्यकारी मंडळाची रचना व अधिकार यांचा विचार पाहूं. या मंडळांत :—

( १ ) उपकुलगुरु हा अधिकारपरत्वें अध्यक्ष १
( २) प्रांतांतील शिक्षणाधिकारी(Director of Public Instruction) १
( ३ ) चर्चामंडळानें निवडलेले सभासद ९
( ४ ) विद्यामंडळानें निवडलेले सभासद ५
( हे भिन्न शाखांचे प्रातिनिधिक असे असावेत.) एकूण १६

कार्यकारी मंडळाची मुदत ३ वर्षांची आहे. कार्यकारी मंडळास विद्यापीठाच्या घटनेंत जबाबदारीचें काम आहे. विद्याविषयक सर्व प्रश्नाबाबत धोरण निश्चित करण्याचें काम विद्यामंडळाकडे असलें तरी त्या धोरणाची अखेर अंमलबजावणी कार्यकारी मंडळाच्या ठरावान्वयेंच होणार. तसेंच निव्वळ विद्याविषयक प्रश्नांखेरीज अनेक बाबी, आय-व्यय, विद्यापीठाच्या मालमत्तेची व्यवस्था, संलग्न महाविद्यालयांवर (Affiliated Colleges) देखरेख करविणें, नवी महाविद्यालयें संलग्न करून घेणें, पुण्यांतील घटक महाविद्यालयांच्या (Constituent Colleges) हरएक गरजा पुरवणें, अधिकारी व कामगार नेमणें, नियमांची अंमलबजावणी करणें इत्यादि सर्व कामें कार्यकारी मंडळाकडे आहेत.

पुणें विद्यापीठांतील विद्यामंडळाची (Academic Council) रचना पुढील प्रमाणें—

वर्ग पहिला, अधिकारपरत्व :--

(१) कुलगुरु, अध्यक्ष
(२) शाखा प्रमुख
(३) महाविद्यालयांचे प्राचार्य
(४) मान्यता मिळालेल्या संस्थांचे प्रमुख
(५) विद्यापीठानें नेमलेले प्राध्यापक
(६) अभ्यास मंडळाचे प्रमुख

वर्ग दुसरा. सामान्य सभासद :--

(१) प्रत्येक संपूर्ण महाविद्यालयांतील अध्यापकांनीं निवडलेला प्रतिनिधि.

(२) प्रत्यक्ष शिक्षणकार्यांत गुंतलेले पण नामांकित शिक्षण तज्ज्ञ असे तिघेजण

या विद्यामंडळाची मुदतहि तीन वर्षांची आहे. विद्यापीठाच्या कार्यांत विद्यामंडळास खरेंखुरें महत्त्वाचें स्थान आहे. चर्चामंडळ किंवा कार्यकारी-मंडळ यांचीं कार्यक्षेत्रें विद्यामय वातावरणानें भरलेलीं अशीं नाहींत. एके ठिकाणीं सर्वसाधारण चर्चा व दुसरीकडे सर्व प्रकारची अंमलबजावणी होत राहील. पण विद्यामंडळाचें काम विद्यापीठांत विद्यामय वातावरण निर्माण करण्याचें आहे. तेथें अधिकारलोलुपतेच्या चढाओढीस स्थान नसावें. तेथें निरनिराळ्या अभ्यासक्रमांचा विचार होत जाईल याची दक्षता घेतली जावी. अभ्यासक्रमाबाबतचे अनेक प्रश्न चर्चिले जावे हें या मंडळाचें काम आहे. प्रत्येक विषयाचें अभ्यासमंडळ आपापल्या विषयाचा अभ्यासक्रम आंखण्यास समर्थ आहे असें मानलें तरी, सर्व विषयांचा साकल्येंकरून परस्परांशीं संबंध व प्रमाणशीरपणा यासंबंधीं जरूर ती दक्षता घेणें हें विद्यामंडळाचें काम आहे. या मंडळाकडे अनेक सूचना येणार, अनेक अभ्यासक्रमाबद्दल आग्रह धरला जाणार, संगीत, गायन, नृत्य, चित्रकला, विविध विज्ञान शास्त्रें व समाजशास्त्रें या प्रत्येकाबद्दल आपुलकी असणारा प्रत्येक उत्साही विद्वान् आपल्या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव विद्यापीठांत व्हावा याबद्दल आपलें घोडें पुढें दामटण्याचा प्रयत्न करणार. या सर्वांचें म्हणणें समजावून घेऊन आपल्या शक्त्यनुसार व इष्टध्येयानुसार अवश्य त्या अभ्याक्रमांची तरतूद करणें हें विद्यामंडळाचें काम आहे.

पुणें विद्यापीठांत पुढील शाखांचा सध्यां अंतर्भाव करण्यांत आला आहे.

(१) वाङ्मयीन शास्त्रें, यांत विविध भाषा व गायनादि ललित कलांचा समावेश होतो. (२) शास्त्रें, रसायन, पदार्थविज्ञान, वनस्पति इ. विविध विज्ञानशास्त्रें. (३) कायदा, (४) वैद्यक, (५) स्थापत्य, (६) शेतकी, (७) समाजशास्त्रें: इतिहास, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान इ. विविध शास्त्रें. प्रत्येक

शाखेच्या अध्यक्षास डीन किंवा शाखाध्यक्ष असें म्हणतात. या शाखेंत दर विषयास एक अशीं एकूण ३९ अभ्यासमंडळें तूर्त निर्माण केलीं आहेत. पुढें आणखीहि केलीं जातील. अभ्यासमंडळांत संलग्न महाविद्यालयांतील त्या त्या विषयाचा मुख्य, सभासद म्हणून घेतला जातो. खेरीज विद्यापीठानें नेमलेले प्राध्यापक व कांहीं बाहेरील तज्ज्ञ स्वीकृत (कोऑप्टेड) केले जातात. या सर्व अभ्यासमंडळाचे ठराव शिफारसवजा समजावेत. ते शाखासभेमार्फत (फॅकल्टी) किंवा स्वतंत्रपणें विद्यामंडळाकडे जाणार व विद्यामंडळाच्या पसंतीनंतर ते कार्यकारी मंडळाकडे जाणार व तेथून ते चर्चामंडळापुढें येऊन तेथें पास झाल्यावर त्याची अंमलबजावणी होणार. या सर्व चाळणींतून जातांना बराच वेळ लागतो हें खरें आहे; पण एकवार त्या त्या विषयांतील तज्ज्ञ मंडळानें आपलें काम नीट जबाबदारीनें केलें असेल तर पुढील टप्प्यांतून ते ठराव फारशी चर्चा न होतां पुढें जाऊं शकतात. आज या कामीं दिरंगाई होत असेल तर त्याचें एक कारण सभासदास आपल्या जबाबदारीची नीट कल्पना नसते व कित्येकजण समजत नाहीं तेथेंहि चौकसपणा दाखविणें हें जबाबदारीचें व प्रतिनिधीपणाचें कर्तव्य म्हणून समजतात हें असावें.

विद्यापीठाचें सर्व काम चर्चामंडळ, कार्यकारीमंडळ व विद्यामंडळ यांच्यांत विभागलेलें आहे. कोणाचें कार्यक्षेत्र कोणतें तेंहि कायद्यांत कलमवार सांगितलें आहे. चर्चामंडळानें केलेल्या नियमांना (Statutes) कानू किंवा ठराव म्हणतात. कार्यकारी मंडळानें केलेल्या नियमांना (Ordinance) आवेदन म्हणतात व विद्यामंडळानें केलेल्या नियमांना (Regulations) नियम असें म्हणतात. कोणती गोष्ट Statute किंवा Ordinance किंवा Regulationनें व्हावयाची हें आधींच निश्चित झालेलें असतें.

## विद्यापीठाचें कार्य

पुणें विद्यापीठाचें कार्य द्विविध स्वरूपाचें आहे. तें प्रादेशिक विद्यापीठ असल्याकारणानें महाराष्ट्रांतील दहा जिल्ह्यांच्या व तदंगभूत संस्थानांच्या

क्षेत्रांतील महाविद्यालयें विद्यापीठांत उच्च शिक्षणाचें व विद्यापीठाच्या परीक्षांसाठीं विद्यार्थी तयार करण्याचें कार्य करतील. त्यांवर देखरेख ठेवणें हें एक कार्य होय. कुठल्याहि नव्या कॉलेजास संलग्न कॉलेजचा दर्जा प्राप्त होण्यासाठीं अर्ज करावा लागतो. त्यांत महाविद्यालयाचे चालक मंडळ, प्राध्यापक मंडळ, चालक संस्थेची घटना व आर्थिक स्थिति, महाविद्यालयांतील ग्रंथालय प्रयोगशाळा, क्रीडागणें व वसतीगृहें यांची माहिती असावी लागते. याखेरीज, महाविद्यालयांतील प्राध्यापकांचे पगार, त्यांचे कामाचे तास व त्यांची किमान लायकी ही नियमानुसार आहे कीं नाहीं, महाविद्यालयांत शिकण्यासाठीं ठेवलेली फी योग्य आहे कीं नाहीं वगैरे सर्व गोष्टींबद्दलची जातीनें करून चौकशी करण्यासाठीं विद्यापीठाचें कमिशन (चौकशी मंडळ) जातें व तें आपला वृत्तांत व शिफारस विद्यामंडळास सादर करतें तें सर्व विद्यामंडळाच्या शेऱ्यासह पुढें कार्यकारी मंडळाकडे व तेथून चर्चामंडळाकडे जातें. केव्हां केव्हां संस्थेस कांहीं वर्षांच्या मुदतीपुरतीच संलग्नतेची मान्यता मिळते. महाविद्यालयाप्रमाणेंच संशोधन संस्थानांनाहि नियमाप्रमाणें संलग्न संस्था होतां येते. या सर्व नियमांची जितक्या प्रमाणांत कडक अंमलबजावणी होईल तितक्या प्रमाणांत कॉलेजांतील अध्यापन अधिकाधिक कसदार होण्याचा संभव आहे हें उघड आहे.

पुणें विद्यापीठास कांहीं महाविद्यालयें संलग्न संस्था म्हणून जोडलेलीं आहेत. पण खुद्द पुणें क्षेत्रांतील जीं महाविद्यालयें आहेत तीं विद्यापीठाच्या कार्यापुरती घटक संस्था (Constituent) म्हणून समजलीं जातात. सध्यां कॉलेज शिक्षणाच्या पाहिल्या दोन वर्षांबाबत पुण्यांतील जें तें कॉलेज आपला व्यवहार विद्यापीठाच्या नियमानुसार पण स्वतंत्रपणें करण्यास मोकळें आहे. पण इंटरमिजिएट नंतर बी. ए., एम्.ए. किंवा तत्सम बी. एस्सी., एम्. एस्सी. वगैरेंचे अभ्यासक्रम शिकविण्याबाबत सर्व काम विद्यापीठानें आपल्याकडे घेतलें आहे. आज कदाचित् जागेच्या अभावीं

म्हणा हवें तर, बी. ए. बी. एससी.चे वर्ग महाविद्यालयाच्या इमारतींतून चाललेले असले तरी जागा महाविद्यालयाची पण हुकुमांत विद्यापीठाची अशी स्थिति आहे. या घटक महाविद्यालयांत आजपर्यंत शिकविण्याचें काम करीत असलेल्या प्राध्यापकांपैकीं अनुभवी व नियमाप्रमाणें लायकी असलेल्या प्राध्यापकांस विद्यापीठानें स्वीकृत केलें आहे. या सर्वांस (Contributed Staff) आमंत्रित प्राध्यापक असें म्हणतात. याखेरीज कांहीं विषयास विद्यापीठ स्वतःचे असे प्राध्यापक किंवा उपप्राध्यापक नेमीलच.

मुंबई प्रांताचे मुख्य प्रधान



श्री. बा. गं. खेर

हें स्थानिक शिक्षणाचें काम व्यवस्थित चालविण्यासाठीं विद्यापीठ शिक्षण

समिति (बोर्ड ऑफ् युनिव्हर्सिटी टीचिंग) कायद्यानें निर्माण करण्यांत आली आहे.

विद्यापीठांतून खाजगी शिफारस किंवा वशिलेबाजी यांना वाव राहूं नये म्हणून निरनिराळ्या समित्यांची स्थापना करण्यांत आली आहे. उदाहरणार्थ, विद्यापीठ जे स्वतःचे प्राध्यापक नेमील त्यांची निवडहि एका स्वतंत्र निवड समिति मार्फतच होणार. तसेंच विद्यमान महाविद्यालयांत शिकविणाऱ्यां प्राध्यापकांना विद्यापीठ पदवीपरीक्षेस शिकविण्यास पात्र अशी मान्यता देणार तेंहि काम त्या त्या विषयाची एक समितीच करणार. विद्यापीठाच्या परीक्षांच्या वेळीं परीक्षकांची नेमणूक होणार तीहि एका स्वतंत्र समितिमार्फतच होणार. अशा रीतीनें सर्वत्र नियमबद्धता आणण्याचा प्रथमपासूनच प्रयत्न करण्यांत आलेला आहे.



डॉ. बाबासाहेब जयकर

अजून विद्यापीठाचीं सर्व चक्रें फिरूं लागलीं असें म्हणतां येत नाहीं. उदाहरणार्थ, विद्यापीठांत चालू असलेल्या विद्योपासनेची बहुजन समाजास ओळख व्हावी म्हणून खेडेगांवांतून व्याख्यान-सत्राच्या द्वारें किंवा निवडक वर्ग चालवून ज्ञानप्रसाराची सोय करणें जरूर आहे. यासच इंग्रजींत एक्स्ट्रा म्यूरल ॲक्टिव्हिटी (शिक्षण प्रसारक चळवळी) असें म्हणतात.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. 3920 नों दि ........
वि. 4T-97.

## आशा व आकांक्षा

पुणें विद्यापीठाचें स्वरूप वर दिलेल्या वर्णनावरून लक्षांत येईल. हें विद्यापीठ नुसतें परीक्षा घेणारें यंत्र राहणार नाहीं. खाजगी किंवा सरकारी यत्नानें सुरू होतील त्या महाविद्यालयास नियमाप्रमाणें मान्यता देणें एवढेंच याचें काम नाहीं. येथें शिक्षणाचें काम विद्यापीठामार्फत चालू झालें आहे व संशोधनाची विशेष व्यवस्था होणार आहे. या योगें महाराष्ट्रांतील उच्च शिक्षणाचें पाऊल पुढें पडेल. ३०।३५ वर्षे या ध्येयासिद्धीसाठीं अनेक दिवंगत व विद्यमान व्यक्तींचे श्रम खर्ची पडले. प्रा. महामहोपाध्याय पोतदारांनीं देश डोक्यावर घेऊन जीवाचें रान केलें, ठिकठिकाणीं व्याख्यानें दिलीं, त्या सर्वांचीं तपश्चर्या या विद्यापीठाच्या स्थापनेनें फळास येत आहे. इतर प्रांतांतील विद्यापीठांचा प्रश्न महाराष्ट्रांतील विद्यापीठाच्या प्रश्नामुळें पुढें आला. महाराष्ट्रांत विद्यापीठाची खरीखुरी भूक उत्पन्न झाली हें अभिमानानें लक्षांत ठेवावयास हवें. विद्यापीठ स्थापनेपूर्वींच कित्येक वर्षे येथें प्राच्यविद्यासंशोधन, मराठयांच्या इतिहासाचें संशोधन, अर्थशास्त्रीय संशोधन, रसायन शास्त्रातील संशोधन, तत्त्वज्ञानाचें संशोधन अशी अखंड ज्ञानोपासना त्या त्या शाखेतील व्रती विद्वानांनीं सतत चालू ठेवली होती. सारांश, पुणें विद्यापीठाच्या स्थापनेनें जें झालें तें हेंच कीं, येथील विद्यामय वातावरणास संस्थाबद्ध रेखीव स्वरूप प्राप्त झालें, असें म्हणतां येईल. आतां येथून पुढें येथें शास्त्रांचा अभ्यास होणार, येथें नवे विचार चर्चिले जाणार, येथून सामाजिक व राजकीय प्रश्नांवर तात्त्विक स्वरूपाचें मार्गदर्शन होणार, महाराष्ट्रांतील वनस्पति, डोंगरपठारावरील व समुद्रसपाटीवरील जीवन, निर्वाहाचे भिन्न उद्योग, जीवनाच्या गरजा पुरविणारे धंदे, या सर्वांसंबंधीं शांततेच्या व क्रांतीच्या काळांत उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांचें चिंतन व संशोधन होणार, सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या विद्यापीठांतील विद्वान् बहुजन समाजाच्या भाषेंत

त्यांच्यापर्यंत जाऊन त्यांच्याशीं बोलणार व बहुजन समाजविषयक प्रश्नांचें लोण विद्यापीठापर्यंत जाऊन पोहोंचणार. असें विद्यापीठाचें भव्य स्वरूप शिक्षणमंत्री ना. बाळासाहेब खेर यांनीं आवाक्यांत घेऊन बिल तयार केलें व तें कायदेमंडळांत पास करून घेतलें. ना. बाळासाहेबांच्या हातून महाराष्ट्रास मिळालेली ही सर्वांत मोठी देणगी होय. महाराष्ट्राची फार दिवसाची तळमळ ध्यानांत घेऊन ती तर त्यांनीं मिळवून दिलीच, पण तिच्या यशस्वितेसाठीं आणखी दोन गोष्टी केल्या. डॉ. बाबासाहेब जयकर यांच्या सारख्या व्यापक दृष्टीच्या व महाराष्ट्राबद्दल अभिमान बाळगणाऱ्या सुसंस्कृतास उपकुलगुरु नेमून त्यांच्या हातीं विद्यापीठाचीं सूत्रें दिलीं; व विद्यापीठाच्या कार्यविस्तारास गणेशखिंडीजवळचा गव्हर्नरसाहेबांचा भव्य बंगला व रम्य आवारहि दिलें. ज्यांनीं बनारस येथील हिंदुविश्वविद्यालयाच्या कार्याचा विस्तार व तेथील योजनाबद्ध आंखणी पाहिली असेल त्यांच्या लक्षांत येईल कीं, विद्यापीठाच्या व्यापाचा आंवाका लक्षांत घेण्यांत पंतप्रधानांनीं पं. मालवीयजींचें अनुकरण केलें आहे. अशा वेळीं नवीन जन्मास आलेल्या पुणें विद्यापीठाच्या भरभराटीसाठीं सर्वांनीं मनोभावें साह्य देऊन पंतप्रधानांच्या कळकळीचें व दीर्घ दृष्टीचें तसेंच उपकुलगुरु डॉ. बाबासाहेब जयकर यांच्या वृद्धापकाळांतलि परिश्रमाचें चीज करणें हें आपणां सर्वांचें कर्तव्य आहे.

---

**स्वाध्याय :**

(१) विद्यापीठ स्थापन झालें असें आपण केव्हां समजतों? (२) पुणें विद्यापीठ प्रत्यक्ष स्थापन होण्यापूर्वींच्या प्रयत्नांचा इतिहास द्या. (३) पुणें विद्यापीठाची घटना कशी आहे? (४) बहुजन समाजास याचा फायदा कसा होईल?

---

## पारिभाषिक शब्द

[ पुढें दिलेल्या शब्दांबद्दल आग्रह नाहीं. खरोखरच पुणें विद्यापीठानें समिति नेमून अधिकृत परिभाषा तयार करणें जरूर आहे. तूर्त काम चालू करण्यासाठीं या शब्दांचा उपयोग केला आहे. —लेखक]

| | |
|---|---|
| युनिव्हर्सिटी | विद्यापीठ |
| चॅन्सेलर | कुलगुरु |
| व्हाइसचॅन्सेलर | उपकुलगुरु |
| राजिस्ट्रार | दफ्तरदार, व्यवस्थापक |
| ॲफिलिएटेड | संलग्न |
| कॉन्स्टिटयुअंट | घटक |
| कोर्ट | चर्चामंडळ, सर्वसाधारण सभा |
| एक्झिक्युटिव्ह कौन्सिल | कार्यकारीमंडळ |
| ॲकेडेमिक कौन्सिल | विद्यामंडळ |
| बोर्ड ऑफ स्टडीज | अभ्यासमंडळ |
| डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन | प्रांताचे प्रमुख शिक्षणाधिकारी |
| फॅकल्टी | शाखा |
| डीन | शाखाप्रमुख |
| युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट | विद्यापीठांतील विद्याखातें |
| कॉलेज | महाविद्यालय |
| युनिव्हर्सिटी कमिशन | विद्यापीठाचें चौकशीमंडळ |
| कोऑप्टेड | स्वीकृत |
| ऑर्डिनन्स | आवेदन |
| स्टॅटयूट | ठराव, कानू |
| रेग्युलेशन | नियम |

| | |
|---|---|
| एक्स–ऑफिशिओ | अधिकारपरत्वें |
| प्रोफेसर | प्राध्यापक |
| रीडर | उपप्राध्यापक |
| असिस्टंट प्रोफेसर | दुय्यम प्राध्यापक |
| ट्यूटर | शिक्षा-साहाय्यक |
| लेक्चरर | अध्यापक |
| टीचर | शिक्षक |
| डेमॉन्स्ट्रेटर | प्रयोगदर्शक |
| कॉंट्रिब्यूटेड स्टाफ | आमंत्रित प्राध्यापक |
| बोर्ड ऑफ युनिव्हर्सिटी टीचिंग | विद्यापीठ शिक्षण समिति |

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
ग्रं. क्र. 3920 नों. दि. ........
वि. बा.वा.
IRBK-0103120
IRBK-0103120